# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.**
**दूरध्वाीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फ़ॅक्सः ०२२-२२१६ ३९७६.**
**ई-मेलः mercindia@mercindia.org.in वेबसाईटः www.mercindia.org.in**

## प्रसिध्दी पत्रक

**टाटा पॉवर कंपनी लिमिटेडच्या आर्थिक वर्ष २००६-०७ करिता वार्षिक महसूली गरज (एआरआर) निश्चिती आणि वीज दरात सुधारणा करणे बाबत**

आयोगाने, टाटा पॉवर कंपनी लिमिटेडच्या (टीपीसी) वीज दरात दिनांक १ जुलै, २००४ रोजी सुधारणा केली होती. आयोगाने वीज दराबाबतचे विनियम आणि आयोगाने पारित केलेले काही आदेश यांचा परिणाम म्हणून टीपीसीने आर्थिक वर्ष २००४-०५ आणि २००५-०६ ची शिलकीची/तूटीची योग्य जुळवणी ('ट्र्युइंग अप') करण्यासह आर्थिक वर्ष २००६-०७ च्या वीज दर निश्चितीचा प्रस्ताव, आयोगाकडे दिनांक १६ मे २००६ रोजी सादर केला. आयोगाच्या वीज दराबाबतच्या विनियमांनुसार टीपीसीने त्यांच्या प्रस्तावात निर्मिती, पारेषण आणि वितरण व्यवसायनिहाय खर्च व उत्पन्नाचा तपशील दिला.

२. या प्रस्तावावर आयोगाने जनतेकडून आणि सर्व हितसंबंधितांकडून सूचना मागविल्या आणि मुंबई येथे १२ जून, २००६ रोजी जाहीर सुनावणी घेतली. या प्रक्रियेत ग्राहक प्रतिनिधींनी देखील सक्रिय भाग घेतला. प्राप्त झालेली सर्व निवेदने आणि जाहीर सुनावणीत व लेखी अर्जांद्वारे उपस्थित करण्यात आलेले मुद्दे विचारात घेऊन, आयोगाने आपल्या ३ ऑक्टोबर, २००६ च्या आदेशात टीपीसीच्या आर्थिक वर्ष २००५-०६ आणि २००६-०७ ची वार्षिक महसूली गरज (एआरआर) आणि आर्थिक वर्ष २००६-०७ चे वीज दर ठरविले आहेत.

३. दरम्यान, मा. विद्युत अपील न्यायाधिकरणाने अपील क्र. ३१/२००५ आणि ४३/२००५ मध्ये दि. २२ मे २००६ रोजी असा निर्णय दिला, की ज्या क्षेत्रात आरईएल ग्राहकांना थेट विजेचे किरकोळ वितरण करीत आहे, त्या क्षेत्रात विजेचे किरकोळ वितरण करण्यासाठी टाटा पॉवर कंपनीला (टीपीसी) परवाना दिलेला नाही. परिणामी. टीपीसीच्या बाबतीत यापूर्वी वीजदराचे आदेश पारित करता आले नाहीत. विद्युत अपील न्यायाधिकरणाच्या आदेशास स्थगिती देताना, 'जैसे थे' स्थिती राखण्याचे

आदेश माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आयोगाने टीपीसीच्या बाबतीत वीज दराचा आदेश आता पारित केला आहे.

४. आयोगाच्या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत-

१) टीपीसीच्या विद्युत ग्राहकांच्या बाबतीत सुधारित वीज दर दिनांक १ ऑक्टोबर, २००६ पासून लागू होतील आणि दिनांक ३१ मार्च, २००७ पर्यंत अंमलात राहतील.

२) टीपीसीच्या निर्मिती, पारेषण आणि वितरण कार्यांकरिता वेगवेगळे एआरआर आणि वीज दर ठरविले आहेत.

३) आयोगाने केलेल्या परिगणनेनुसार, आर्थिक वर्ष २००४-०५ करिता नक्त नफा आणि वाजवी परतावा यामध्ये रु. १४३ कोटी शिल्लक असून आर्थिक वर्ष २००५-०६ करिता नक्त नफा आणि वाजवी परतावा यामध्ये रु. ३१३ कोटीची तूट आहे. टीपीसीच्या ग्राहकांचे वीज दर योग्य पातळीवर राखणे शक्य व्हावे म्हणून, सदर शिल्लक आणि त्यावरील व्याज, तसेच टीपीसीकडे असलेले रु. २२६ कोटींचे राखीव निधी यांचे, टीपीसीच्या वितरण कार्याकरिता आर्थिक वर्ष २००६-०७ ची महसूली गरज निश्चित करताना समायोजन करण्यात आले आहे.

४) टीपीसीच्या निर्मिती, पारेषण आणि वितरण या कार्यांकरिता अनुक्रमे रु.२९९४ कोटी, रु.१६९ कोटी, रु.९६८ कोटी इतक्या रकमेचा एआरआर ठरविण्यात आला आहे. इंधन खर्च वाढल्यामुळे वीज खरेदीचा खर्च वाढणे हे वाढीव खर्चाचे मुख्य कारण आहे.

५) आयोगाने, यापूर्वी अंगिकारलेल्या तत्त्वांनुसार आणि कायद्यातील तरतूदींनुसार, वीज दर ठरविले आहेत. मुंबईमध्ये सर्वत्र समान वीज दर असावेत आणि कोणत्याही ग्राहक वर्गवारीस वीज दराचा धक्का न बसू देता क्रॉस-सबसिडी कमी व्हावी या हेतूने हे वीज दर ठरविण्यात आले आहेत.

६) दरमहा ३० युनिट्सपर्यंत कमी विजेचा वापर असलेल्या निवासी ग्राहकांसाठी 'दारिद्र्य रेषेखालील ग्राहक' (बीपीएल) अशी वेगळी वर्गवारी निर्माण करण्यात आली आहे. अशा ग्राहकांकरिता प्रति युनिट ४० पैसे हा सवलतीचा वीज दर ठरवून देण्यात आला आहे.

७) संध्याकाळी ०६.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंतच्या कमाल मागणीच्या काळातील विजेचा वापर कमी व्हावा म्हणून, उच्च दाब औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहक त्याचप्रमाणे कमी दाबाच्या औद्योगिक ग्राहकांच्या बाबतीत वीज वापराच्या दिवसातील वेळेनुसार, (टीओडी) वीज दर लागू करण्यात आले आहेत.

८) मीटर्स बसविण्यातील मर्यादा आणि ग्राहकांची ओळख पटविण्यातील अडचणी लक्षात घेऊन उच्च दाब औद्योगिक ग्राहक आणि वाणिज्यिक ग्राहक त्याचप्रमाणे एचटी-पब्लिक, जे संमिश्र भाराचे उप-वितरणाचे काम करतात, ते या आदेशाच्या दिनांकापासून आणखी सहा महिने याच वर्गवारीत राहतील, असा निर्णय आयोगाने घेतला आहे. त्यानंतर या वर्गवारीतील ज्या ग्राहकांना एकबिंदू पुरवठा हवा असेल, त्यांना तो फ्रँचायचीजच्या मार्फत घ्यावा लागेल, किंवा संबंधित वर्गवारीत व्यक्तिगत जोडण्या घ्याव्या लागतील.

९) महाराष्ट्र राज्य सध्या तीव्र वीज टंचाईच्या समस्येतून वाटचाल करीत आहे. आणि आजवर भारनियमनातून वगळण्यात आलेल्या मुंबई शहरालादेखील येत्या उन्हाळी महिन्यांत वीजटंचाईची झळ पोहोचेल अशी शक्यता आहे. या क्षेत्रात अतिरिक्त क्षमता उपलब्ध नसल्याने आणि पारेषण मार्गाच्या उपलब्धतेतील प्रचलित मर्यादा यांमुळे वीज बचत आणि भार व्यवस्थापन यांच्या अल्पकालीन तसेच दीघकालीन उपाययोजनांची जास्त वीज वापरणाऱ्या सर्व वीजग्राहकांकडून आखणी ही एक तातडीची गरत आहे. हे साध्य करण्यासाठी, वीज बचतीची सवय रुजविण्याकरिता, जास्त वीज वापरणाऱ्या ग्राहकांना आर्थिक संकेत देण्याचे तत्व आयोगाने स्वीकारले आहे.

१०) टीपीसीच्या परवान्याच्या क्षेत्रातील, दरमहा ३०० युनिट्सपेक्षा अधिक वीज वापर असलेल्या सर्व निवासी आणि वाणिज्यिक ग्राहकांना तसेच सर्व औद्योगिक ग्राहकांना (त्यांचा विजेचा वापर कितीही असला तरी) त्यांना विजेचा मासिक वापर मागील वर्षातील (जानेवारी २००५ ते डिसेंबर, २००५) त्या त्या महिन्यातील विजेचा वापराच्या ८० टक्के पर्यंत खाली आणावा लागेल. ज्या ग्राहकांचा विजेचा वापर ८० टक्क्यांपेक्षा जास्त होईल त्यांना, त्यांच्या वर्गवारीला लागू असलेल्या उच्चतम वीज दराच्या अतिरिक्त १०० टक्के "भार व्यवस्थापन

आकार” लागू होईल आणि तो त्या महिन्याच्या विजेच्या देयकात ग्राहकाला आकारण्यात येईल. ज्या सेवा अत्यावश्यक सेवा म्हणून निश्चित करण्यात आल्या आहेत, अशा सेवांना भार व्यवस्थापन आकारातून वगळण्यात येत आहे.

११) मासिक वीज वापरात, मागील वर्षातील (जानेवारी २००५ ते डिसेंबर, २००५) त्या त्या महिन्यात झालेया वीज वापराच्या ठरवून दिलेल्या ८० टक्के पातळीपेक्षाही कमी वापर केल्यास, अशा ग्राहकाला कमी वापर झालेल्या युनिट्ससाठी, त्या वीज वापराच्या टप्प्याला लागू असलेल्या वीज दरात ५० टक्के सूट, “भार व्यवस्थापन सूट” प्रोत्साहन म्हणून देयकामध्ये समायोजन करुन देण्यात येईल.

१२) वरील बार्बीमुळे वीज दरात प्रत्यक्ष सुमारे ५.६ टक्क्यांच्या दरम्यान वाढ होईल.

१३) जेव्हा विद्युत कंपन्यांमध्ये करारांतर्गत वीजप्राप्तीखेरीज विजेची अन्य देवाणघेवाण राज्यांतर्गत होते, तेव्हा, अशा देवाणघेवाणीसाठी पुरवठा करणाऱ्या वीज कंपनीला झालेल्या वाढीव खर्चाइतका दर लागू करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.

१४ा) टीपीसीच्या विद्युत जाळ्यात मुक्त प्रवेशासाठी ग्राहकांनी द्यावयाचे ‘वहन आकार’ ( व्हिलींग चार्जेस ) आयोगाने विनिर्दिष्ट केले आहेत.

१५) क्रॉस-सबसिडी अधिभार हा शून्य म्हणून ठरविण्यात आला आहे.

१६) टीपीसीच्या ग्राहकांना लागू असलेल्या कमी दाब व उच्च दाब वीज दराचा सारांश **जोडपत्र-१** मध्ये देण्यात आला आहे.

१७) वीज दरात केलेल्या सुधारणांमुळे ग्राहकांच्या वीज वापराच्या नमुना पातळीवर आधारित मासिक देयकावर होणारे परिणाम **जोडपत्र-२** मध्ये दाखविण्यात आले आहेत.

सही/-
सचिव, मविनिआ

मुंबई,
३ ऑक्टोबर, २००६

**Annexure -1: Summary of HT and LT Tariff effective from October 1, 2006 in TPC-D license area**

| Sl. | Consumer category & Consumption Slab | Tariffs | |
|---|---|---|---|
| | | Fixed/Demand Charge (Rs/kVA/month) | Energy Charge (p/kWh) |
| | **Low Tension Categories** | | |
| 1 | **Residential (LF-1)** | | |
| | ***Below Poverty Line (BPL)*** | Rs. 3 per month | 40 |
| | ***Other Residential*** | | |
| | 0-100 units | Rs. 30 per month | 160 |
| | 101-300 units | Rs. 50 per month$$ | 360 |
| | Above 300 units (balance units) | | 575 |
| | | | |
| 2 | **LT-1** (LT Industrial & Commercial below 15 HP load) | Rs. 150 per month | 460 |
| | | | |
| 3 | **LT-2** (LT Industrial & Commercial above 15 HP load) | 374 | 350 |
| | ***TOD Tariffs (in addition to above base tariffs)*** | | |
| | ***1800 hours to 2200 hours*** | | *60* |
| | ***Remaining hours of the day*** | | *0* |
| | | | |
| 4 | Advertisement & Hoardings | Rs. 200 per month | 1100 |
| | | | |
| | **High Tension Categories** | | |
| 5 | **HT Public** | 374 | 290 |
| | | | |
| 6 | **HT Industrial & Commercial** | 374 | 315 |
| | ***TOD Tariffs (in addition to above base tariffs)*** | | |
| | ***1800 hours to 2200 hours*** | | *60* |
| | ***Remaining hours of the day*** | | *0* |
| | | | |
| 7 | **Railways** | | |
| | 33/22/11/6.6 kV | 340 | 315 |
| | 100 kV | | 309 |

**Notes**:
1. Fuel Adjustment Cost (FAC) will be applicable to all consumers and will be charged over the above tariffs, on the basis of the FAC formula prescribed by the Commission, and computed on a monthly basis.
2. $$: Fixed charge of Rs. 100 per month will be levied on residential consumers availing 3 phase supply. Additional Fixed Charge of Rs. 100 per 10 kW load or part thereof above 10 kW load shall be payable.
3. $$$: In case of LF-2 (commercial) consumers and Temporary connections, additional Fixed Charge of Rs. 150 per 10 kW load or part thereof above 10 kW load shall be payable.

## Annexure - 2: Impact on Monthly Bills due to revised tariffs for TPC

| Sl. | Consumer Category | Monthly Consumption (units) | Billing Demand (kVA) | Monthly Bill (Rs) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Existing Tariff | Revised Tarif | Increase/ (Reduction) | |
| 1 | **Residential - BPL category** | 25 | | 61 | 13 | (48) | -79% |
| 2 | **Residential Category** | 75 | 0 | 134 | 150 | 16 | 12% |
| | | 125 | 0 | 266 | 300 | 34 | 13% |
| | | 400 | 0 | 1,248 | 1,505 | 257 | 21% |
| | | | | | | | |
| 3 | **LT-I** | 4000 | 0 | 16,978 | 18,150 | 1,172 | 7% |
| | | | | | | | |
| 4 | **LT-II** | 10000 | 40 | 47,030 | 48,960 | 1,930 | 4% |
| | | | | | | | |
| 5 | **HT - Public** | 40000 | 500 | 299,280 | 303,000 | 3,720 | 1% |
| | | | | | | | |
| 6 | **Railways** | 100000 | 500 | 450,700 | 485,000 | 34,300 | 8% |
| | | | | | | | |
| 7 | **HT Industries** | | | | | | |
| | **>1000 kW** | 250000 | 2000 | 1,512,250 | 1,535,500 | 23,250 | 2% |